RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक २९(२)] गुरुवार, मार्च ७, २०१९/फाल्गुन १६, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ६३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश याव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ मार्च २०१९

### अधिसूचना

**कारखाने अधिनियम, १९४८.**

क्रमांक एफएसी. २०१८/प्र.क्र. १४६/कामगार-४.— कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ४०-ब च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि शासकीय अधिसूचना, क्रमांक एफएसी, १०८१/८५११/कामगार-४, दिनांक २ ऑगस्ट १९८२ चे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील १, २, ३ या परिच्छेदामध्ये वर्णन केल्याप्रमाणे राज्यातील कारखान्याच्या प्रत्येक भोगवटादारास संबंधित परिच्छेदामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, सुरक्षा अधिकाऱ्यांच्या संख्ये इतक्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याकरीता फर्मावीत आहे.

१. परिच्छेद २ आणि ३मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्यांव्यतिरिक्त इतर प्रत्येक कारखान्यांच्या बाबतीत,-

(क) जेथे सर्व साधारणपणे १,००० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु २,००० पेक्षा अधिक नसतील इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या १ इतकी असेल ;

(ख) जेथे सर्व साधारणपणे २,००० पेक्षा अधिक, परंतु ५,००० पेक्षा अधिक नसतील इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या २ इतकी असेल ;

(ग) जेथे सर्वसाधारणपणे ५,००० पेक्षा अधिक कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ३ इतकी असेल.

२. महाराष्ट्र कारखाने (औद्योगिक मोठे अपघात धोके नियंत्रण) नियम, २००३ च्या नियम २ च्या खंड (घ) मध्ये व्याख्या केलेल्या मोठे अपघात प्रत्येक कारखान्याच्या बाबतीत, धोके असलेल्या आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ यांच्या नियम ११४ अन्वये तसे घोषित केलेल्या सात, पंधरा, वीस, एकवीस, तेवीस आणि सव्वीस या अनुसूच्यांखालील धोकादायक काम करणाऱ्या कारखान्यांच्या बाबतीत,—

(क) जेथे सर्वसाधारणपणे ५० किंवा त्यापेक्षा अधिक, असतील परंतु ५०० पेक्षा अधिक नसतील इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या १ इतकी असेल ;

(ख) जेथे सर्व साधारणपणे ५०० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु १,००० पेक्षा अधिक नसतील इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या २ इतकी असेल ;

(ग) जेथे सर्वसाधारणपणे १,००० पेक्षा अधिक, परंतु २,००० पेक्षा अधिक नसतील इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ३ इतकी असेल ;

(घ) जेथे सर्वसाधारणपणे २,००० पेक्षा अधिक, परंतु ५,००० पेक्षा अधिक नसतील, इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ४ इतकी असेल ;

(ड) जेथे सर्वसाधारणपणे ५,००० पेक्षा अधिक कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ५ इतकी असेल ;

३. कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) चे कलम २ चा खंड (सीबी) मध्ये व्याख्या केलेली धोकादायक प्रक्रिया ज्या कारखान्यांमध्ये करण्यात येते त्या कारखान्यांच्या बाबतीत,—

(क) जेथे सर्वसाधारणपणे २५० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु ५०० पेक्षा अधिक नसतील, इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या १ इतकी असेल ;

(ख) जेथे सर्वसाधारणपणे ५०० पेक्षा अधिक, परंतु १,००० पेक्षा अधिक नसतील, इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या २ इतकी असेल ;

(ग) जेथे सर्वसाधारणपणे १,००० पेक्षा अधिक, परंतु २,००० पेक्षा अधिक नसतील, इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ३ इतकी असेल ;

(ड) जेथे सर्वसाधारणपणे २,००० पेक्षा अधिक, परंतु ५,००० पेक्षा अधिक नसतील, इतके कामगार कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ४ इतकी असेल ;

(इ) जेथे सर्वसाधारणपणे ५,००० पेक्षा अधिक, परंतु १,००० पेक्षा अधिक कामावर नियुक्त असतील तेथे,— सुरक्षा अधिकाऱ्यांची संख्या ५ इतकी असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. श्री. ल. पुलकुंडवार**
शासनाचे उप सचिव.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 7th March 2019

*NOTIFICATION*

FACTORIES ACT, 1948.

No. FAC-2018/C.R.146/Lab-4.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 40B of the Factories Act, 1948 (63 of 1948),in its application to the State of Maharashtra, and in supersession of the Government Notification, No. FAC. 1081/8511/Lab.-4, dated the 2nd August 1982, the Government of Maharashtra hereby requires every occupier of the factory in the state, as is described in paragraphs 1, 2 and 3 below to employ such number of safety officers as is specified in the respective paragraph.

1. In respect of every factory other than those referred to in paragraphs 2 and 3,—

(*a*) wherein 1,000 or more workers but not exceeding 2,000 workers are ordinarily employed-number of safety officers-1 ;

(*b*) wherein more than 2,000 workers but not exceeding 5,000 workers are ordinarily employed-number of safety officers-2 ;

(*c*) wherein more than 5,000 workers ordinarily employed-number of safety officers-3 ;

2. In respect of every Major Accident Hazards (MAH) Factory as defined in clause (*d*) of rule 2 of the Maharashtra Factories (Control of Industrial Major Accident Hazards) Rules, 2003 and factories having dangerous operations under schedules VII, XV, XX, XXI, XXIII and XXVI declared under rule 114 of the Maharashtra Factories Rules, 1963,—

(*a*) wherein 50 or more workers but not exceeding 500 workers are ordinarily employed-number of safety officers-1 ;

(*b*) wherein more than 500 workers but not exceeding 1,000 workers are ordinarily employed-number of safety officers-2 ;

(*c*) wherein more than 1,000 workers but not exceeding 2,000 workers are ordinarily employed-number of safety officers-3 ;

(*d*) wherein more than 2,000 workers but not exceeding 5,000 workers are ordinarily employed-number of safety officers-4 ;

(*e*) wherein more than 5,000 workers ordinarily employed-number of safety officers-5.

3. In respect of the factories wherein hazardous process as defined in clause (*cb*) of section 2 of the Factories Act, 1948 (63 of 1948) is carried out,—

(*a*) wherein 250 or more workers but not exceeding 500 workers are ordinarily employed-number of safety officers-1 ;

(*b*) wherein more than 500 workers but not exceeding 1,000 workers are ordinarily employed-number of safety officers-2 ;

(*c*) wherein more than 1,000 workers but not exceeding 2,000 workers are ordinarily employed-number of safety officers-3 ;

(*d*) wherein more than 2,000 workers but not exceeding 5,000 workers are ordinarily employed-number of safety officers-4 ;

(*e*) wherein more than 5,000 workers ordinarily employed-number of safety officers-5.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. S. L. PULKUNDWAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.